# स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेत कॉक्सिटची अश्विनी बिराजदार तृतीय

लातूर(दि.२४)-लातूर पंचायत (पाणी पुरवठा व स्वछता विभाग) समिती यांनी आयोजित केलेली तालुकास्तरीय स्वछता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा नुकतीच येथील अंबेजोगाई रोडवरील कॉक्सिटमध्ये झाली. या स्पर्धेमध्ये कॉक्सिटच्या अश्विनी बिराजदार या विद्यार्थीनीने तिसरा क्रमांक प्राप्त केला. महाविद्यालयीन तरूणामध्ये स्वच्छतेचे महत्व व समाजामध्ये जागृती करण्यासाठी आयोजित स्पर्धेच्या उदघाटनपर भाषणात

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनकर जगदाळे म्हणाले की, जे विद्यार्थी नवे विचार मांडतील त्यांची अमंलबजावणी करण्याचा प्रयत्न प्रशासन करेल. गावस्तरावर लाभार्थ्यापर्यंत विविध योजना पोहोचविण्यासाठी महाविद्यालयांनी प्रयत्न केल्यास विद्यार्थ्यांना चांगला अनुभव मिळू शकेल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी धनवंतकुमार माळी यांनी केले. ते म्हणाले की विविध स्पर्धातून यश मिळवित विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास साधता येतो. लातूर तालुक्याने वक्तृत्व करंडक स्पर्धेत जिल्हापातळीवरच नव्हे तर राज्यपातळीवरही नाव गाजवेल अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली.

कनिष्ठ महाविद्यालय गटात २५ विद्यार्थ्यांनी तर वरिष्ठ महाविद्यालय गटात २८ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. कनिष्ठ गटातून नितीन मोराळे याने प्रथम, लक्ष्मी धुमाळ द्वितीय व सुरेंद्र स्वामी तृतीय क्रमांक प्राप्त केला. तर कनिष्ठ गटामध्ये शरद देशमुख प्रथम क्रमांक , अरूण धायगुड द्वितीय क्रमांक, कॉक्सिटच्या अश्विनी बिराजदार हीने तृतीय क्रमांक प्राप्त केला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनकर जगदाळे, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी महेशकुमार मेघमाळे, कॉक्सिटचे उपप्राचार्य एन.एस.झुल्पे, उपप्राचार्य डॉ.बी.एल.गायकवाड, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी (पाणीपुरवठा)अधिकारी शाम पटवारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) संजय तुबाकले, सहाय्यक गटविकास अधिकारी बी.टी.चव्हाण, व पंचायत समितीचे इतर विस्तार अधिकारी व शिक्षकवर्ग उपस्थित होते.स्पर्धेसाठी परिक्षक म्हणुन प्रा.कैलास जाधव, प्रा.तानाजी खरबड, प्रा.जे.ए.चव्हाण, प्रा.दादासाहेब लोंढे, प्रा.बसवराज करकिली, प्रा.सारूळ यांनी काम पाहिले.